सहायक (मुख्य) परीक्षा - 2015
दि. 8/11/2015

**A**

**2015**

CODE : **VO6**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

**प्रश्नपुस्तिका-I**

**मराठी व इंग्रजी**

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑     ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

1. 'अरी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पुढीलपैकी कोणता ?

(1) अमृत (2) विष (3) सखा (4) रवी

2. पर्यायी उत्तरांतील कोणते धातुसाधित गटाबाहेरचे आहे ?

(1) कर (2) तूट (3) लाभ (4) फोड

3. खाली दिलेल्या वाक्यांतून विशेषण असणारे वाक्य निवडा.

(1) दशरथाने कैकयीला दोन वर दिले. (2) तू त्या राजपुत्राला वर.

(3) पक्षी झाडावर बसतो. (4) वरपिता मुलाच्या लग्नात उपस्थित नव्हता.

4. खालील पर्यायी उत्तरांतील 'तत्सम शब्द' कोणता ?

(1) दूध (2) मस्तक (3) झोप (4) इंजेक्शन

5. 'सुधाने निबंध लिहिला असेल'. या वाक्याचा काळ ओळखा :

(1) रीती भविष्यकाळ (2) पूर्ण भविष्यकाळ

(3) अपूर्ण भविष्यकाळ (4) साधा भविष्यकाळ

6. खालील प्रांत व त्यांचे स्वदेशी शब्द यांच्या योग्य जोड्या जुळवा :

| | **प्रांत** | | **स्वदेशी शब्द** |
|---|---|---|---|
| (a) | गुजराती | (i) | तूप, गुढी, गुंडी |
| (b) | तामिळी | (ii) | ताळा, अनारसा, शिकेकाई |
| (c) | कानडी | (iii) | दादर, डबा, दलाल |
| (d) | तेलगू | (iv) | चिल्लीपिल्ली, सार, मठ्ठा |

वरील जोड्यांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा.

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

7. पुढील विधाने वाचा :

(a) 'ॲ' व 'ऑ' हे नवे स्वरादी मराठीत इंग्रजीतून आले.

(b) 'अं' व 'अ:' हे दोन स्वरादी नाहीत.

(c) ए, ऐ हे संयुक्त स्वर नाहीत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) चूक

(3) फक्त (c) चूक (4) (a), (b), (c) तिन्हीही चूक

---

8. पुढील शब्दातील उपसर्गघटित शब्द निवडा :

(1) अधिपती (2) रक्षक (3) विसराळू (4) भांडखोर

---

9. 'हसरा मुलगा' या वाक्यातील 'हसरा' या शब्दातील 'रा' हा प्रत्यय कोणत्या अर्थाचा आहे ?

(1) कर्तृवाचक (2) युक्तार्थक (3) क्रियावाचक (4) योग्यार्थक

---

10. पर्यायी उत्तरांतील 'विध्यर्थी क्रियापद' असलेले वाक्य कोणते ?

(1) माझ्याच्याने ते काम होणार नाही. (2) अवकाळी पाऊस आला.

(3) सर्वांनी पंक्तीत येऊन बसा. (4) अंगी धैर्य असणाऱ्यांनीच हे कार्य करावे.

---

11. 'मूर्खपणाचा सल्ला देणारा' - या शब्दसमूहाला खाली दिलेल्या शब्दसमूहातील लागू न पडणाऱ्या शब्दाचा पर्याय द्या :

(1) अकलेचा कांदा (2) अरण्य पंडित

(3) उंटावरचा शहाणा (4) कळीचा नारद

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

12. 'आई मुलाला हसविते' या वाक्यात हसविते हे ________ क्रियापद आहे.

(1) संयुक्त (2) शक्य (3) करणरूप (4) प्रयोजक

13. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा :

(a) अकारांत पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप आ - कारांत होते.

(b) अकारांत स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात ए - कारांत होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) बरोबर (2) केवळ (b) बरोबर

(3) (a) आणि (b) बरोबर (4) (a) आणि (b) चूक

14. वचनभेदाप्रमाणे बदलणारी सर्वनामे किती आहेत ? पर्यायी उत्तरांतील योग्य पर्यायी उत्तर कोणते ?

(1) चार (2) पाच (3) सहा (4) सात

15. 'मज्जन' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) दात घासण्याचे चूर्ण (2) स्नान (3) मनाई (4) मगज

16. विधाने वाचा :

(a) न, म, ही अनुनासिके आहेत.

(b) द, ध, ही कठोर व्यंजने आहेत.

(c) प, फ, ही मृदु व्यंजने आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) चूक (2) फक्त (a) चूक (3) (a) व (c) बरोबर (4) फक्त (a) बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

17. पुढील विधाने वाचा :

(a) संयुक्त वाक्य तयार करताना केवल वाक्यातील क्रियापदाचे रूप बदलत नाही.

(b) वाक्ये जोडताना पण, परंतु, आणि, व अशा प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययाचा संयुक्त वाक्य तयार करताना उपयोग केला जात नाही.

(c) केवल वाक्याचा एकच उद्देश असतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (b) बरोबर (2) केवळ (a) व (c) बरोबर

(3) (a), (b) व (c) तिन्हीही बरोबर (4) (a), (b), (c) तिन्हीही चूक

---

18. पर्यायी उत्तरांतील 'तद्‌भव शब्द' ओळखा.

(1) जल (2) प्रीति (3) कान (4) भगवान

---

19. पर्यायी उत्तरांतील 'मिश्र वाक्य' कोणते ?

(1) उद्या सुट्टी मिळाल्यावर मी तुझ्या घरी येईन.

(2) उद्या सुट्टी मिळेल. मी तुझ्या घरी येईन.

(3) उद्या सुट्टी मिळाली तर मी तुझ्या घरी येईन.

(4) उद्या सुट्टी मिळेल आणि मी तुझ्या घरी येईन.

---

20. पर्यायी उत्तरांतील कोणते पर्यायी उत्तर गटाबाहेरचे आहे ?

(1) चाणाक्ष (2) धूर्त (3) चपळ (4) मठ्ठ

---

21. पुढील विधाने वाचा :

(a) जा, ये, कर, बस, पोल हे साधित शब्द आहेत.

(b) करू, कर्ता, होकार, प्रतिकार हे सिद्ध शब्द आहेत.

(c) प्र, परि, अप हे उपसर्ग लागून उपसर्गघटित शब्द बनतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर (2) (b) बरोबर (3) (b) चूक (4) (c) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

**22.** पर्यायी उत्तरांतील 'विधानार्थी वाक्य' कोणते ?

(1) तू गावी केव्हा जाणार आहेस.
(2) अरेव्वा, तू गावी जाणारच तर
(3) माझे वडील आज परगावी गेले.
(4) मी मुळीच गावी जाणार नाही.

---

**23.** खालील विधाने पहा :

(a) सामान्यनामाची अनेक वचने होत नाहीत.

(b) विशेषनामांची अनेकवचने होतात.

पर्यायी उत्तरांतून **योग्य** पर्यायी उत्तर सांगा :

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b) बरोबर
(3) (a) आणि (b) बरोबर
(4) (a) आणि (b) चूक

---

**24.** जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | अव्ययीभाव समास | (i) | महाराष्ट्र |
| (b) | तत्पुरुष समास | (ii) | चंद्रशेखर |
| (c) | द्वंद्व समास | (iii) | आमरण |
| (d) | बहुव्रीही समास | (iv) | केरकचरा |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

25. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा :

(a) 'कडे, मध्ये, प्रमाणे' ही शुद्ध शब्दयोगी अव्यये आहेत.

(b) 'च, मात्र, ना' ही शुद्ध शब्दयोगी अव्यये नाहीत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b) बरोबर
(3) (a) आणि (b) बरोबर
(4) (a) आणि (b) चूक

---

26. खालील वाक्यातील काळ ओळखा.

'मधू लाडू खात जाईल'.

(1) साधा भविष्यकाळ
(2) अपूर्ण भविष्यकाळ
(3) पूर्ण भविष्यकाळ
(4) रीती भविष्यकाळ

---

27. 'अभिधा शक्तीचे' उदाहरण असलेले वाक्य पर्यायी उत्तरांतील कोणते आहे?

(1) काय गाढव आहे!
(2) मला फार भूक लागली.
(3) शेजारच्या गावी आम्ही नदीवरून जातो.
(4) 'मुलांनो, आता दिवे लागणीची वेळ झाली.'

---

28. पर्यायी उत्तरांतील 'संकेतार्थी वाक्य' ओळखा.

(1) हे तत्व साधं आहे.

(2) अडीच रूपयाचे बी पेरून दोन पैशांचीही भाजी मिळाली नाही.

(3) वारा आला आणि पाऊस गेला.

(4) तुम्ही आलात तर मी सुद्धा तुमच्या घरी येईन.

---

29. पुढे दिलेल्या वाक्यांतून साधित क्रियापद असलेल्या वाक्याचा अचूक पर्याय निवडा :

(1) विद्यार्थ्यांनी अभ्यास केला पाहिजे.
(2) शिक्षक मुलांना शिकवतात.
(3) सचिनने चौकार मारला.
(4) जुन्या आठवणीने माझे डोळे पाणावले.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

30. पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचा शब्द कोणता ?

(1) धकाधक (2) धकाधकी (3) धकधक (4) झोंबी

31. खालील 'अनुकरणवाचक शब्द' कोणत्या शब्दाच्या जातीचा आहे ?

'सुटसुटीत'

(1) नाम (2) विशेषण (3) क्रियापद (4) क्रियाविशेषण

32. पुढे दिलेल्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | सर्वनामे | (i) | आज, काल, तेथे, फार |
| (b) | क्रियाविशेषणे | (ii) | व, आणि, परंतु, म्हणून |
| (c) | उभयान्वयी अव्यये | (iii) | शाब्बास, अबब, अरेरे |
| (d) | केवलप्रयोगी अव्यये | (iv) | मी, तू, हा, जो, कोण |

उत्तरासाठी योग्य तो पर्याय निवडा :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

33. 'नपुंसक' शब्दाचा समास ओळखा :

(1) नञ् बहुव्रीही समास (2) विभक्ती बहुव्रीही समास

(3) द्विगू समास (4) द्वंद्व समास

34. 'देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो'

या संतवचनात _________ या उभयान्वयी अव्ययाचा वापर केला आहे.

(1) विकल्पबोधक (2) न्यूनत्वबोधक (3) कारणबोधक (4) उद्देशबोधक

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

35. कोणत्याही क्षेत्रात हळूहळू होणाऱ्या इष्ट बदलास ________ म्हणतात.

(1) प्रगती (2) क्रान्ती (3) परिवर्तन (4) उत्क्रांती

36. पुढील विधाने वाचा :

(a) कर्मणी प्रयोगात कर्म प्रथमेचे असते.

(b) कर्तरी प्रयोगात क्रियापद कर्माप्रमाणे चालते.

(c) त्याने लवकर यावे, हं भावे प्रयोगाचे उदाहरण आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) चूक (a), (c) बरोबर

(3) फक्त (a) चूक (b), (c) बरोबर (4) फक्त (c) चूक (a), (b) बरोबर

37. 'अदकोस' या उपसर्गघटित शब्दाला लागलेला उपसर्ग ________ भाषेतील आहे.

(1) मराठी (2) फारसी (3) कानडी (4) संस्कृत

38. पुढील विधाने वाचा :

(a) सामासिक शब्दातील तत्सम (ऱ्हस्व) इ-कारान्त व उ-कारान्त, शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे.

(b) ई-कारान्त व ऊ-कारान्त शब्दातील उपान्त-कार व उ-कार ऱ्हस्व लिहावे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) चूक (2) फक्त (b) चूक

(3) (a) व (b) बरोबर (4) (a) व (b) दोन्ही चूक

39. खाली दिलेल्या वाक्प्रचारातून वेगळ्या अर्थाच्या वाक्प्रचाराचा पर्याय निवडा :

(1) आकाश पाताळ एक करणे. (2) घर डोक्यावर घेणे.

(3) जिवाचा आटापिटा करणे. (4) जिवाचे रान करणे.

40. खालील वाक्यातील अधोरेखित शब्द काय दर्शवितो ?

'तुमची पवळी गाय हिरवे गवत <u>मुळीच</u> खात नाही.'

(1) उद्देश्य विस्तार (2) विधेय विस्तार (3) कर्म (4) मुख्य उद्देश्य

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

41. खालील वाक्यातील कर्ता कोणता ?

'त्या कन्येला बिंदिया शोभते'.

(1) त्या (2) कन्येला (3) बिंदिया (4) शोभते

---

42. खालील म्हण पूर्ण करा.

'मारून मुटकून ——'

(1) टाकणे (2) फेकणे (3) आणणे (4) तुडविणे

---

43. पर्यायी उत्तरांतील 'संयुक्त वाक्य' ओळखा.

(1) सकाळी आठ वाजता मी बाहेर जाण्याच्या तयारीत होतो.

(2) सकाळी आठ वाजण्याचा सुमार असावा. मी बाहेर जाण्याच्या तयारीत होतो.

(3) सकाळी आठ वाजले आणि मी बाहेर जाण्याच्या तयारीला लागलो.

(4) जेव्हा मी बाहेर जाण्याच्या तयारीला लागलो तेव्हा आठ वाजण्याचा सुमार असावा.

---

44. खालील पर्यायी उत्तरांतील 'विधानपूरक शब्द नसलेले वाक्य' कोणते ?

(1) माधव चांगला आहे. (2) पेरू पिकलेला निघाला.

(3) श्रीमंत रागावलेले दिसतात. (4) राजनच्या घराचे दार उघडले.

---

45. पर्यायी उत्तरांत 'चतुर्थी विभक्तीचे अपादान कारकार्थ' असलेले वाक्य कोणते ?

(1) त्याच्या नाकाला धार लागली आहे.

(2) तुझ्या हातून हे काम होणार नाही.

(3) त्याचे लिहून झाले.

(4) मी रात्री घरी परतेन.

---

46. पुढीलपैकी कोणता शब्द अभ्यस्त नाही ते सांगा ?

(1) अतिशय (2) दगडबिगड (3) हळूहळू (4) घरघर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

**47.** पुढील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा :

(a) विशेषनाम हे व्यक्तिवाचक असते.

(b) सामान्यनाम हे जातिवाचक असते.

(c) सामान्यनामे व विशेषनामे यांना धर्मिवाचक म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (a) व (c) चूक

(3) फक्त (b) व (c) बरोबर (4) (a), (b), (c) तिन्ही बरोबर

---

**48.** 'ताई' हा शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) देशी (2) परप्रान्तीय (3) तत्सम (4) तद्भव

---

**49.** 'ओनामा' या शब्दाचा समानार्थी शब्द पुढीलपैकी कोणता ?

(1) शेवटी (2) प्रारंभ

(3) अभाव (4) दूषित ज्वराचा एक प्रकार

---

**50.** 'नीरव' या शब्दाचा संधी विच्छेद कसा होतो ?

(1) नि: + रव (2) नी + रव (3) नी: + रव (4) नि + रव

---

**51.** चूक की बरोबर सांगा :

(a) आपण जी लिपी वापरतो तिला बाळबोध लिपीही म्हणतात.

(b) देवनागरी लिपी उभ्या, आडव्या, तिरप्या, गोलसर अशा रेषांनी बनलेली असते.

(c) देवनागरी लेखकाच्या उजवीकडून डावीकडे लिहिली जाते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (c) चूक (2) फक्त (a) चूक

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (b) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

52. खाली मराठी व्याकरणातील संधींचे काही प्रकार व त्यांची उदाहरणे दिलेली आहेत.

| | **संधी** | | **उदाहरण** |
|---|---|---|---|
| (a) | सजातीय स्वरसंधी | (i) | वाङ्‌निश्चय |
| (b) | अनुनासिक संधी | (ii) | घामोळे |
| (c) | पूर्वरूप संधी | (iii) | गुरुपदेश |
| (d) | पररूप संधी | (iv) | खिडकीत |

उत्तरासाठी योग्य तो पर्याय निवडा :

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (iii) | (i) | (iv) | (ii) |

53. पुढील म्हण पूर्ण करा.

'दुहेरी बोलाची ________.'

(1) एकेरी करणीची (2) कवडी मोलाची (3) दुटप्पी वागणुकीची (4) पै किंमतीची

54. खालील वाक्यांपैकी शब्दयोगी अव्ययाचा उचित प्रयोग असलेले वाक्य ओळखा :

(1) देशासाठी प्राण अर्पण करणारे हुतात्मे होत.

(2) पतंग वर जात होता.

(3) सूर्य ढगामागे लपला.

(4) मागे या ठिकाणी विहीर होती.

55. पर्यायी उत्तरांतील 'शुद्ध शब्द' कोणता ?

(1) जमीनजुमला (2) जमिनजुमला (3) जमीनजूमला (4) जमिनजूमला

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

**पुढे दिलेला उतारा वाचून त्यावर प्रश्न क्रमांक 56 ते 60 या प्रश्नांची उत्तरे पर्याय वाचून लिहा :**

देवळें आणि देव यांची आज कशीं विल्हेवाट लावावी याचा विचार करण्यापूर्वी, या दोन संस्था मूळ अस्तित्वांत कशा आल्या, याची रूपरेषा वाचकांपुढे ठेवणें जरूर आहे. यासाठी आर्यसंस्कृतीच्या जोडीनेंच इजिप्त आणि मेसापोटेमियाकडे परिणत होत असलेल्या सेमेटिक लोकांच्या संस्कृतीचा प्राचीन इतिहास आपण संक्षेपानें समालोचन केला पाहिजे. आर्यांप्रमाणेंच सेमेटिक लोक गुरेंढोरें पाळून, आज या ठिकाणीं तर उद्या त्या ठिकाणीं वसाहत करणारे धाडशी भटके होते. आर्यांनीं ऋग्वेद रचनेपर्यंत, म्हणजे निसर्गपूजनापर्यंत आपल्या धर्मविषयक कल्पनेची कांही तरी ठळक रूपरेषा आखली होती. पण सेमेटिक लोक धर्मविषयक कल्पनेंत इतके व्यवस्थित बनलेले नव्हते. आस्ते आस्ते ते निश्चित धर्मकल्पना बनविण्याच्या घटनेत होते. तथापि आर्य झाले काय किंवा सेमेटिक झाले काय, 'धर्म' शब्द उच्चारतांच आज आपल्या ज्या कांही भावना होतात, त्या भावनांचा त्यावेळी दोघांनाही काही थांग लागलेला नव्हता. आर्यांनी पंजाब सर केल्यावर आणि त्यानंतर अनेक शतकें त्यांच्या धर्मकल्पनेंत देवळे घुसली नव्हतीं, त्यांच्या संघ-व्यवस्थेंत राजन्यांच्या (क्षत्रियाच्या) पाठोपाठ उपाध्यायांचा भिक्षुक भटांचा, वर्ग जरी निर्माण झाला होता, तरी देवळांची कल्पना कोणालाच स्फुरण पावलेली नव्हती. या बाबतींत इजिप्तकडच्या सेमेटिक व सुमेरियन संघांनीच प्रथमत: पुढाकार घेतल्याचे इतिहासावरून दिसते. इजिप्त आणि मेसापोटिमियांत शहरांची प्रथम वस्ती होऊ लागली. त्याचवेळीं प्रत्येक शहरांत एक किंवा अनेक देवळांचा उगम प्रथम झालेला आढळतो. हीं देवळे सामान्यत: राजवाड्यांनजीकच असत. मात्र देवळाचा घुमट राजवाड्याच्या घुमटापेक्षां विशेष उंच बांधण्यात येत असे. देवळांचा हा प्रघात फिनीशियन, ग्रीक व रोमन शहरांतहि पुढें पसरत गेला. इजिप्त आणि सुमेरप्रमाणेंच आफ्रिका युरप आणि आशियाच्या पश्चिम भागांकडे जेथे जेथे प्राचीन संस्कृतीचें पाऊल पडत गेलें, तेथें तेथें देवळांची उत्पत्ती प्रथमत:च ठळकपणे इतिहासांत दृष्टीस पडते. अखिल मानवांच्या उत्क्रांतीच्या व संस्कृतीच्या इतिहासांत देवळांची कल्पना ही अशी प्रथमच जन्माला आलेली आहे.

या सर्व देवळांत आंतल्या बाजूस एक देवघर किंवा गाभारा असे, त्यांत अर्ध पशू व अर्धमानव अशा स्वरूपाची एक आक्राळ विक्राळ अगडबंब मूर्ती बसविलेली असे. त्याच्या पुढें एक यज्ञकुंड असून देवाला द्यावयाच्या बळींची त्यावर कंदुरी होत असे. ही मूर्ती म्हणजे देव किंवा देवाचें प्रतीक म्हणून व देऊळ म्हणजे या देवाचे वसतिस्थान म्हणून मानण्यांत येत असे. देऊळ नव्हतें तोंपर्यंत देव नव्हता, अर्थात त्याच्या सेवेकऱ्यांचीहि गरज नव्हती व उत्पत्तीहि नव्हती. पण देवळांत देव येऊन बसल्यावर त्याच्या पूजाअर्चेसाठी शेकडो भट आणि भटणी, तेलबत्तीवाले, झाडूवाले, कंदुरीवाले, धुपारी, शेजारतीवाले असे अनेक लोक निर्माण झाले. प्रत्येक जणांचा पेहेराव निराळा. लोकांतले शिष्ट लोकमान्य काय ते हे. आर्यांप्रमाणें, जो क्षत्रिय तोच ब्राह्मण, तोच गृहपती यजमान, वेळ पडेल तसें काम करणारा, ही पद्धत या लोकांत नव्हती. यांनी आपापला एक निराळाच ठराविक व्यवसायाचा संघ बनविला. भट म्हणजे भट, मग तो कंदुरी करायचा नाहीं. कंदुरीवाला निराळा. सारांश, प्रत्येकाने आपापली एक ठराविक धंद्याची जातच बनविली; आणि बहुजन समाजांतले पुष्कळ हुषार लोक देवळाच्या या बैठ्या परंतु किफायतशीर धंद्यात घुसले.

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

56. आर्यांनी कोणती ठळक रूपरेषा आखली होती ?

(1) ऋग्वेद रचना (2) निसर्ग पूजन

(3) गुरेंढोरें पाळणे (4) धर्मविषयक कल्पना

---

57. या लेखाला योग्य शीर्षक द्या :

(1) देव आणि देवळांच्या निर्मितीचा इतिहास

(2) धार्मिक अधिष्ठान

(3) धर्मविषयक कल्पना

(4) देव-देवळांचा किफायतशीर धंदा

---

58. शेकडो भट-भटणी, तेलबत्तीवाले, झाडूवाले, कंदुरीवाले, धुपार्ती, शेजार्तीवाले असे लोक केव्हा निर्माण झाले ?

(1) शहरांची निर्मिती झाल्यावर

(2) देवळात देव बसल्यावर

(3) ऋग्वेदाची रचना झाल्यावर

(4) धर्मविषयक कल्पना आल्यावर

---

59. आर्य आणि सेमेटिक यांना कोणत्या भावनांचा थांग लागलेला नव्हता ?

(1) धर्म (2) देवळे

(3) संस्कृती (4) जाती

---

60. देवळांची कल्पना प्रथमत: कोणाला सुचली ?

(1) आर्य (2) भिक्षुकभट

(3) सेमेटिक व सुमेरिअन (4) फिनीशिअन

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

**61.** Which of the following words meaning "a government official" has been spelt correctly ?

(1) bureaucrat (2) bureocrat (3) bureaocrat (4) buoreaocrat

**62.** What is the meaning of 'Gratis' ?

Choose the meaning from :

(1) To be grateful (2) To be paid well

(3) To be paid later (4) Without payment

**63.** Many of the incidents in the autobiography appear to be <u>fictitious</u>.

Select the word which is opposite in meaning of the underlined.

(1) imaginary (2) boring (3) creative (4) genuine

**64.** Which of the following is not the exact synonym of the word given below ?

Childish

(1) puerile (2) juvenile (3) silly (4) childlike

**65.** <u>He likes people to praise him</u>.

Identify the correct passive form of the above sentence.

(1) He likes to be praised by people. (2) People liked him to praise.

(3) He is liked by people to praise. (4) People are praised by him.

**66.** Fill in the blanks with suitable prepositions :

__________ order __________ avoid litigation, she accepted her crime.

(1) For, of (2) From, to (3) In, from (4) In, to

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

67. If I ________ the race, I would have been congratulated by all.

Select the correct alternative to complete the sentence.

(1) win (2) won (3) have won (4) had won

---

68. Fill in the blank with the appropriate preposition :

I feel sorry for not being able to attend ________ you.

(1) for (2) to (3) with (4) no preposition

---

69. He said, "May God pardon my sins."

Identify the correct indirect narration of the above.

(1) He prayed that God might pardon his sins.

(2) He said that God may pardon his sins.

(3) He prayed that God will pardon his sins.

(4) He said that if God may pardon his sins.

---

70. Identify the exact meaning of the following words :

descent, dissent

(1) climb down, show disagreement (2) show disagreement, climb down

(3) go up, show agreement (4) show agreement, climb up

---

71. Which one of the following words is opposite in meaning to the word "transparent" ?

(1) clear (2) translucent (3) sharp (4) opaque

---

72. Identify the correct verb agreement :

The introduction of English, Marathi and other regional languages ________ profound effect on the students' linguistic competence.

(1) has had (2) have had (3) are (4) have

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

73. Find out the antonym for the following word : Strange

(1) familiar (2) unfamiliar (3) weak (4) strong

---

74. Enjoy the album of <u>tender</u> love songs.

Pick out the correct meaning of the underlined word in the given context.

(1) kind (2) delicate (3) gentle (4) romantic

---

75. Substitute the phrase "one who hates women" with one of the following correct words :

(1) saddist (2) misogynist (3) misogamist (4) misanthrope

---

76. The superlative degree of the word 'Fore' will be __________ :

(1) Former (2) Foremost (3) Forth (4) None

---

77. <u>Violence</u> <u>to see</u> <u>all around</u> <u>so much</u> <u>it is painful.</u>
A B C D E

Pick out the correct alternative showing meaningful sequencing of the above jumbled structure.

(1) EACDB (2) EBDAC (3) DACBE (4) CABDE

---

78. When the meaning of one form or word is included in the meaning of another word it is called __________.

(1) synonymy (2) antonymy (3) homophony (4) hyponymy

---

79. Is not wisdom better than riches ?

The above sentence can be changed into assertive sentence as the following :

(1) Riches are not better than wisdom.

(2) Wisdom is not better than riches.

(3) Riches are better than wisdom.

(4) Wisdom is better than riches.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

80. Choose the correct modal indicating moral obligation :

I _________ help those who need my help.

(1) will (2) shall (3) can (4) should

81. Choose the correct conjunction :

She bought a car, _________ she was too young to learn to drive.

(1) if (2) because (3) although (4) if not

82. Obsession with music is _________.

Choose the correct alternative to complete the sentence.

(1) melomania (2) musomania

(3) discomania (4) acousticophobia

83 Fill in the blank with the appropriate word :

I can't _________ with this cruelty.

(1) bear (2) beer

(3) baer (4) none of the above

84. (a) The host and the hostess were kind to us.

(b) Bread and butter is my favourite food.

Identify the correct sentence :

(1) Only (a) is correct

(2) Only (b) is correct

(3) Both (a) and (b) are correct

(4) Both (a) and (b) are incorrect

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

**85.** Choose the correct alternative from those given below :

He will win the race, if he ________ running regularly.

(1) practises (2) would practise

(3) will practise (4) were to practise

---

**86.** I am certain of giving you satisfaction.

Select the correct alternative, that could replace the phrase underlined.

(1) that I shall give (2) that I give

(3) that I might give (4) about giving

---

**87.** The rebels returned home under an amnesty.

Choose the word nearest in meaning to the underlined.

(1) Police security (2) Reliability (3) General pardon (4) Sympathy

---

**88.** Polygamy is ________ for Hindus in India.

Pick out the correct word to complete the sentence meaningfully.

(1) prescribed (2) proscribed (3) proceeded (4) presided

---

**89.** Let's have a game of cricket.

Which one of the following is the correct tag question to be added to the above statement ?

(1) have we ? (2) haven't we ? (3) should we ? (4) shall we ?

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

90. You must work hard. Otherwise you won't pass.

Which one of the following sentences converts the above sentences into a complex sentence with an adverbial clause ?

(1) You must work hard if you won't pass.

(2) If you must work hard, you won't pass.

(3) You won't pass unless you work hard.

(4) You must work hard till you won't pass.

---

91. Plutocracy is ________.

Choose the correct alternative to complete the sentence meaningfully.

(1) Government by the rich (2) Government by the nobles

(3) Government by the officials (4) Government by the people

---

92. Choose one of the following words which best expresses the meaning of the word "Vacillate" :

(1) waver (2) never (3) quiver (4) queer

---

93. The feminine gender for 'boy' would be 'girl'. Then what will it be for 'Bachelor' ?

(1) Girl friend (2) Sister (3) Maid (4) Cousin

---

94. ________ modern.

Select a correct prefix to form a meaningful word.

(1) hyper (2) ultra (3) arch (4) sub

---

95. ESPN is showing all the matches live.

Which one of the following corresponds to the above sentence in passive voice ?

(1) All the matches are shown live on ESPN.

(2) All the matches will be shown live on ESPN.

(3) All the matches would be shown live on ESPN.

(4) All the matches are being shown live on ESPN.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

**Read the following passage and answer the following questions on the basis of information provided in the passage.**

Our body is a wondrous mechanism and when subjected to unusual stress over a period of time, it adapts itself to deal more effectively with that stress. So when you exert your muscles against resistance, they are forced to adapt and deal with this extraordinary work load. This is the principle of weight training. Strands of muscle fibres become thicker and stronger in response to the demands placed on them.

One of the great merits of weight training is the strength of your heart. During weight training, your heart is forced to beat faster and stronger in order to pump sufficient blood to the muscles being worked. In time, your heart, like your body, will adapt to this extra-workload by becoming stronger and more efficient. Since your body needs a given amount of blood to perform its daily tasks your heart will now need fewer beats to pump the same quantity of blood. Sounds good ? There's more. Your entire circulatory system is given a thorough workout everytime you exercise, which increases its overall efficiency. Even the neural paths from your brain's command centres to each individual muscle become more effective, enabling easier recruitment of muscle fibres for carrying out physical tasks. In essence, your body becomes a well-oiled and finely-tuned piece of machinery, whirring along without any break-down. In today's stress filled world, you need all the help you can get.

---

**96.** What affects the nature of muscle fibres ?

(1) Intensity of workload (2) Alimentary system

(3) Nutrition (4) Stress imposed on them

---

**97.** What does the term 'Well-oiled' in the passage denote ?

(1) Healthy (2) Efficient (3) Massaged (4) Trained

---

**98.** Select the most appropriate title for the passage.

(1) Health is Wealth

(2) Exercise - its benefits

(3) The fundamentals of weight training

(4) How to retain your health

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

99. The passage suggests ________.

(1) Physical exercise is necessary occasionally

(2) We should carryout physical exercise as a routine

(3) We should ignore physical exercise

(4) We should subject our body to as much exercise as it can withstand

---

100. What is the principal training of weight lifting ?

(1) Adapting the body to muscle force

(2) Adapting muscles to force implied on them

(3) Disposing extra-workload

(4) Mechanised response to external conditions

---

- o 0 o -

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.fb.com/mpscmaterial www.mpscmaterial.com